जा.क्र.१८०८/२०२४,
अभिलेखशाखा, जिल्हा न्यायालय, पुणे
दिनांक :२७/०३/२०२४

प्रति,

मा. अध्यक्ष,
पुणे बार असोसिएशन, शिवाजीनगर, पुणे
बारामती बार असोसिएशन, खेड राजगुरूनगर बार असोसिएशन, घोडनदी बार असोसिएशन, सासवड बार असोसिएशन, भोर बार असोसिएशन, जुन्नर बार असोसिएशन, वडगाव मावळ बार असोसिएशन, पिंपरी चिंचवड बार असोसिएशन, आकुर्डी बार असोसिएशन, घोडगाव बार असोसिएशन, इंदापूर बार असोसिएशन, दौंड बार असोसिएशन, खडकी छावणी असोसिएशन, पुणे छावणी असोसिएशन,

विषय : अभिलेखशाखा, जिल्हा न्यायालय, पुणे येथील मोस्तरकामी जमा असलेल्या प्रकरणांचे फाडकाम करणेबाबत...

संदर्भ : मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील तपासणी अहवाल सन २०२३ चे अहवालातील त्रुटींची पुर्तता करणेबाबत...

महोदय,

वरील संदर्भांकिंत विषयांस अनुसरून तसेच मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचे आदेशावरून आपणास कळविण्यात येते की, अभिलेखशाखा, जिल्हा न्यायालय, पुणे येथील मोस्तरकामी जमा असलेल्या दिवाणी प्रकरणांच्या बी व सी फाईलचे फाडकाम दिवाणी प्रक्रिया संहिता पॅरा ५४४ नुसार सुरू करावयाचे आहे. बी फाईल जतन करण्याचा कालावधी ३० वर्षे तर सी फाईल जतन करण्याचा कालावधी १२ वर्षे आहे. सी फाईलमध्ये निशाणी नंबर असलेली दाखल कागदपत्रे तसेच साक्षी पुरावा ठेवण्याची तरतूद आहे.

सदरचे काम मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील तपासणी अहवाल सन २०२३ ची पुर्तता करणेकामी सुरू करावयाचे आहे. त्याकरीता बी फाईल सन १९८६ ते १९९३ व सी फाईल सन २००४ ते २०११ या कालावधीतील निकाली प्रकरणातील बी व सी फाईलचे फाडकाम करावयाचे आहे.

तरी संबंधित वकील व पक्षकार यांना आवश्यकता वाटल्यास त्यांनी सदर

प्रकरणांतील कागदपत्रे व साक्षी पुरावा यांच्या नकला तसेच दाखल केलेली मुळ कागदपत्रे त्वरीत घेऊन जाणेबाबतची नोंद घ्यावी.

सदरचे पत्र आपलेकडील बार असोसिएशनचे सर्व सभासद यांचे निदर्शनास आणून दयावे.

DISTRICT COURT डिस्ट्रिक्ट कोर्ट सत्यमेव जयते पुणे PUNE

हुकूमावरून,

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे